

# स-सासुचा

## “ ई-साहित्य प्रतिष्ठान ”

संपादक -

सुप्रिया (जोशी) जाधव. पुणे
रेणुका (रेपाळ) खटावकर. पुणे
सुधीर सुरेश मुळीक. मुंबई

अंक - १२

## तशी माझी सासु गोड आहे ...

कडू कारल्याची फोड आहे
तशी माझी सासु गोड आहे !..

आंबट तिखट थोडे बोलणे
जखमेला मग मीठ चोळणे
जिभेवरचा मोठ्ठा फोड आहे
तशी माझी सासु गोड आहे !..

भलतेच वागणे असते कडक
बेधडक अशी खडबडी सडक
स्वभाव जरा विजोड आहे
तशी माझी सासु गोड आहे !..


म्यचिंग बांगड्या टापटीप साडी
कोलांट्या उड्या उगा लाडीगोडी
नत्या जुन्याचा जोड आहे '
तशी माझी सासु गोड आहे !..

रंगमंच रोज रोज सजवते
एकपात्री अभिनय छान रंगवते
सगळ्यांच्या तोडीस तोड आहे
तशी माझी सासु गोड आहे !..

सात मजली मोठ्ठे हसणे
सारखे सारखे रुसणे फुगणे
स्टार प्लसचा न संपणारा
दररोजचा एपिसोड आहे
तशी माझी सासु गोड आहे !..

- मनिषा नाईक.





## मना सज्जना सासू ऐशी असावी ...


जगी गोड सासू अशी कोण आहे ?
विचारी मना तूची शोधूनी पाहे
जिच्या कौतुके जावया धाप लागे
तिचे पाद दोन्ही कुठे सापडावे ?

जिची सून स्तोत्रे म्हणाया थकेना
गुणांच्या मण्यांच्या गळा सात माळा
जिच्या एक शब्दी मिळे स्वर्ग सारा
अशी थोर सासू जगी दाखवा ना !

जगी जीस येती कराया चहाड्या
गुणां भागुनी दोष येती गुणाया
गणितात ऐशा गती थोर जिला
"सासू" उपाधी मिळे मात्र तिला !

परी अंतरी एक ध्यानी धरा रे
सासू अखेरीस माणूस आहे
तिच्या ह्या "गुणां" नेत्र काणा करावा
तिचा शब्द प्रत्येक हृदयी धरावा !

पतीला म्हणे जी "तुझी थोर आई"
अशी सून अन्ती पसंतीस येई
जिला जावई खुद्द घेऊन येतो
तिला "प्यार" होतो, जगी धन्य होतो !



मना ऐक रे मीही होणार सासू
कुणाला दिसावे तिचे नम्र आसू ?
उद्याची तयारी अताला करावी
जगी एक सासूच हाती धरावी.

शिकाव्या तिच्या चार युक्त्या-प्रयुक्त्या
तिला दोन गोष्टी मजेशीर द्याव्या
जगी थोर पुण्याई घेऊन आला
मिळे गोड सासू जगी ह्या तयाला !!


- प्रभा .

असं म्हणतात, देव सर्वत्र असू शकत नाही,
म्हणून त्यानं 'आई' बनवली......

खरंच आहे...

कारण जेव्हा सैतानाला हे समजलं,
तेव्हा त्यानंही हाच विचार केला की
आपणही सर्वत्र असू शकत नाही, म्हणून...

... म्हणून त्यानं 'सासू' बनवली!!!!




# तशी माझी सासू फ़ार गोड आहे ...

'हे' रत्न हिच्या पोटी कसं ?
एक मोठं कोडं आहे,
कारण .....
तशी माझी सासू फ़ार गोड आहे !
.
.
ती शांत तर हा घुमा...
ती माउली थोर... हा घरादारा घोर...
तीच्या शांततेला विचारांची जोड आहे..


तशी माझी सासू फ़ार गोड आहे !
.
.
हिच हसणं.....सनईचे सूर...
ह्याचं रुसणं.....विझल्या निखा-यातला धूर...
तीच्या ह्न्दयात जरी माजलेलं काहूर आहे...

तशी माझी सासू फ़ार गोड आहे !
.
.
हिची होते सा-यांसाठी तड्फ़ड...
छोट्या छोट्या गोष्टीवरुन ह्याची कडकड...
तिच्याकडे मात्र या सा-याची नामी तोड आहे...

तशी माझी सासू फ़ार गोड आहे !



- सुप्रिया (जोशी) जाधव.



## माझ्या सासूची महती ...

माझ्या सासूची महती । शब्दांनी वर्णावी किती ।
मी बापडी अल्पमती । थोडासा प्रयत्न माझा ॥

डोळे सारखे वटारलेले । जणू निखारे पेटलेले ।
पाहताच शब्द खुंटले । मी मुकी राहते ॥


प्रत्येकाच्या चुका काढी । गप्प बसल्या उगाच खोडी ।
उत्तर देता बेदम फोडी । जिभेच्या पट्ट्याने ॥

चहा नाश्ता ठरल्या वेळी । अन्यथा शब्द बंदूकगोळी ।
खाती तत्याची गरम पोळी । चुलीपाशी बसूनी ॥

येताजाता चकली चिवडा । फरसाण भजी आणि वडा ।
रात्री ओवाहिंगाचा काढा । अजीर्ण होते म्हणूनी ॥

बामच्या डब्या पिवळ्यानिळ्या । उगाळण्या मात्रा मुळ्या ।
खोकून कफाच्या गुठळ्या । हवे तिथे थुंकती ॥

मुलावरती प्रेम फार । त्यांच्या मते सून चुकार ।
सारखा होतो उद्धार । माझ्या माहेराचा ॥



तोही बने आईचा बाळ । मान खाली, दिसे मवाळ ।
माझ्यासाठी शब्दांचा दुष्काळ । चुकले नाही तरी ॥

मोकळ्या हवेची गोडी । फिरायला लेकाची गाडी ।
दोघांचा बेत लगेच ताडी । येती खो घालाया ॥


दोघांनी कधी निवांत बसावे । डोळ्यांनी प्रेम बोलावे ।
यांचे बीपी लगेच वाढावे । नको त्या वेळी ॥

बिचारे सासरे मौन असती । हळूच मला सांत्वना देती ।
खुणेनेच मला सांगती । त्यांना काय हवे ते ॥

असे आहे सासूपुराण । मिळाले प्रारब्धाचे वाण ।
संपणार नाही वर्णन । किती लिहिले तरी ॥

- सौ.कल्याणी .





# माझ्या बेरकी मांजरा ...

( रुणुझुणुत्या पाखरा, जा रे माझ्या माहेरा
या "टिळा लाविते मी रक्ताचा" या चित्रपटातील गीताच्या चालीवर. )

पहिला कोरस  चाल - घागर घुमू दे घुमू दे

सासू येणार, येणार / आला ग बाई सांगावा
आता घरात, दारात / होईल रोज कांगावा

माझ्या बेरकी मांजरा / तुला लोण्याचा कटोरा
आली सासू माझी दारी / तिला "प्रसाद" दे जरा
माझ्या बेरकी मांजरा ...//धृ //

सासू माझी द्वाड भारी / गोड कडूलिंबापरी
मुक्ताफळांच्या घोटांनी जीव होतो ग घाबरा
माझ्या बेरकी मांजरा ...// १ //

दुसरा कोरस चाल - सौभाग्याचं लेणं गवर माझी लेवू दे

अश्शी फणकारते बनेल माझी सासू ग
कध्धी यायचं नाही थोबाडावर हासू ग
माझ्या बेरकी मांजरा ...


तोफ मुलुखमैदान / उडविते दाणादाण
जसा खौट खोबऱ्याचा तोंडी भरला तोबरा
माझ्या बेरकी मांजरा ...// २ //

तिसरा कोरस [चाल - सौभाग्याचं लेणं गवर माझी लेवू दे]

चांगलं काही बघता पोटात हिच्या दुखतं ग
माझं सौख्य डोळयांत कुसळावानी खुपतं ग
माझ्या बेरकी मांजरा ...

जसा डंबरा ओलांडे / तशी कचाकचा भांडे
केले अंगारे-धुपारे / रोग नाही झाला बरा
माझ्या बेरकी मांजरा ...// ३//

- क्रांति रेडकर.



एकदा स्वर्गाच्या दारात प्रवेश घेणाऱ्यांची रांग लागली होती. बायकांना अर्थातच स्वर्गात सरळ प्रवेश होता व पुरुषांना रांगेत उभे राहुन परिक्षा दिल्यावर प्रवेश मिळायचा. पुरुषांची रांग दोन प्रकारची होती. एका रांगेत असे पुरुष होते जे जिवंतपणी त्यांच्या बायकोच्या धाकात होते तर दुस-या रांगेत जे आपल्या बायकोच्या धाकात नव्हते.धाकात असणा-यांची संख्या प्रचंड होती तर धाकात नसणा-या लोकांच्या रांगेत फक्त एकच माणूस ऊभा होता.

सर्व जण त्याच्याकडे आश्चर्याने बघत होते व त्याच कौतुकही करत होते. शेवटी एकाने त्याला त्याच्या हिमतीच कौतुक करत यातील गुपीत विचारले.

तेंव्हा तो म्हणाला, " अरे गुपीत काही नाही,
माझ्या बायकोने सांगीतल म्हणुन मी येथे उभा आहे."

# माझी सासू ...

माझी सासू कडक आहे
बोलण्याला तडक आहे
नवीन साडी घातली की म्हणते
"कलर थोडा भडक आहे" !...


माझी सासू जाम आहे
ए.सी. मधला घाम आहे
लावल्यानंतर डोके दुखते
असा झंडू बाम आहे !...


माझी सासू सैंपल आहे
न हसता येणारं डिंपल आहे
चारचौघात लपावावे असं
गालावरचं पिंपल आहे !...

माझी सासू भांडेल आहे
आऊटडेटेड सैंडल आहे
भंगारातही घेत नाहीत असं
१९४७ चे मॉडेल आहे !...

हे सगळं सोडलं तर,
तशी माझी सासू गोड आहे !
कैरीची फोड आहे..
कितीही आंबट असली तरी
मना तिची ओढ आहे !...

- राज





# सासू लई ग्वाड ...

सासू म्हणजे काय ?
सारख्या सूचना,,,
सुनेला कंटाळा येईल इतक्या..

सून म्हणते--
सासूबाई, सूचना नको...
काम करू का ऐकत बसू ?

मुलाकडे कोण बघणार ?
इकडे आड तिकडे विहीर...
ती जन्मदात्री, ही अर्धांगिनी ...

बिचारे सासरे,
खिशात ठेवत आले कापसाचे बोळे,
मारून मुटकून चेहरा खुलवणारे...

तशी हिची सासू लई ग्वाड बर का ?

- अरविंद चौधरी.



## सासू महामाया ...

हिडिंबेची काया
बकासूरी खाया
अत्वल ती //

सासू ल ई गुणी
पट्टा लोण्यावा णी
तिच्याविण सुनी
चाळ सारी //


सासू एके सासू
पाढा हा ना चुके
स्वामी त्रैलोक्याचा
शरण रे //

सासू कुंभकर्ण
ढोल-ताशे-अस्त्र
तिच्यापुढे शस्त्र
मान टाकी //


म्हणून म्हणते.....

भक्ता हात जोड
सासू म्हण गोड
विखावरी तोड
रेणू म्हणे //





-रेणुका (रेपाळ)खटावकर



## सासूबाई नका दावू रंग ...

सासूबाई सासूबाई नका दावू रंग
न्यारा आहे तोरा तुमचा, वेगळा हो ढंग !..

दमून भागून घरी येतो, आम्ही राजा राणी
आल्या आल्या सुरु होते तुमची पिपणी !..

हे दुखतय ते दुखतय, किती ती गा-हाणी
वैद्य झाले बुवा झाले, पळे तोंडचे पाणी !..

तुमच अरस्स, तुमच तरस्स, ऐकून किटती कान
गोतावळा जमविता, वेळे-काळाचे ना भान !..

लेक तुमची वाटे तुम्हा सौदर्याची खाण
जावयाची उणी-दुणी, त्याला काडीचे न ज्ञान !..

वरण-भात, भाजी-पोळी, चिकन-मटणावर पाबंद
पार्ट्या, आउटींग, मित्र-मंडळ, सारे-सारे कि हो बंद !..

भल्या पहाटे सुट्टीलाही, मोठ्याने चालू स्तोत्र-पुराण
हे देऊळ, तो नवस, अस्सा आमलात आणता प्ल्यान !..

लाख लाख मानतो आभार ,येता-जाता मी 'वरच्याचे'
खाण तशी माती नाही, नाहीतर खरे नव्हते माझे !..

सासूबाई सासूबाई, तुमचे साहिले की रंग
न्यारा आहे तोरा तुमचा, वेगळा हो ढंग !..

- सुप्रिया (जोशी) जाधव.

# सून आळविते ...

सून आळविते , बसावी निवांत
सासू व्हावी शांत ,पांडुरंगा ||

तशी माझी सासू ,आहे खूप गोड
तीला नाही तोड, त्रिभुवनी ||

तिचे रंग न्यांरे, कुणाला कळेना
सूर हे जुळेना , संसाराचे ||

कसेही कुठेही , काहीही बोलावे
बेताल वागावे , नाही भीती ||

नसे तीला भान .घालते आरोळी
कधी ही अवेळी , रात्र दिनी ||


कोणाच्याही पुढे, सांगेल गाऱ्हाणे
सदा रड गाणे , ओठावरी ||


येणारे जाणारे , परकेच गोड
सून असे त्वाड ,तिच्या साठी ||

मिळे अशी सासू, सोडेना ही पाठ
बांधलेली गाठ ,जन्म भरी ||

घालीन लोटांगण ,धरेन चरण
जरीहे मरण, रोज वाटे ||

मनिषा नाईक.





## सासू जेथेची आहे सून तेथेची राहावी ...

सासू जेथेची आहे सून तेथेची राहावी
भांडणा कारणे नसती ती क्षणात त्हावी

नाते जुने ,गडी नवे ,तिखट मिठाई चूगल्याची
मनी देत्ष,मुखी आदर,चेहरे स्मित राहावी

साडी चोडी, अलंकार आणिक राहणी मान
मुसळ शोधूनी करती एकमेकाचा अपमान

मुलगा,सासरा,नवरा नाम बाहुले घराशी
खेळ चालला त्यांचा,झळ पोहचे यांच्या जीवाशी

पैसा अडका द्रत्य नित यांच्या चरणी लोळावी
बैल घाण्याचे सम्बोधती नरा,आसवे त्यांनी गाळावी

नित राहती सोबती तरी न सोबत लाभलेली
गाडे वोढती शेवटास चाके ती लहान मोठी थांबलेली

इतिहास सांगतो आणिक अशीच पुनरावृत्ती घडावी
सासू सुनेच्या आणिक सून सासूच्या गळा पडावी

- निलेश



## किती गोड सासू ...

कुणाला मिळाली किती गोड सासू
कुणाला कळाली किती गोड सासू !..


मुलाला मुठीबद्ध ठेवायसाठी
तिच्या हालचाली किती गोड सासू !..

म्हणालास तू सर्व बागेत जाऊ
तरारा निघाली किती गोड सासू !..

घरी सांगतानाच दाटून आले
तशी ती म्हणाली किती गोड सासू !..


तुम्हाला म्हणायास हो काय जाते
स्तुती फार झाली किती गोड सासू !..

- तुषार जोशी





## माझी गोड सासू....!!



त्सुनामीच्या लाटेवर स्वार ती सदा
धडकी भरणारी लाटच ती, अशी तिची अदा
हिसकावून घेते प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचे हासू
अशीच आहे माझी गोड सासू....!!

ज्वालामुखीचा उद्रेक असतो सदा मुखी
येता ती घरा, नसत कोणी सुखी
हिवाळ्यात सुद्धा तिच्या मुळे दुध लागते नासू
अशीच आहे माझी गोड सासू....!!


मंडईचा कलकलही, तिच्या पुढे होतो कमी
तिला शांत करण्याची कोणच देत नाही हमी
तोंडी तिच्या भोंगाच दुसरा, असे लागते नेहमी भासू
अशीच आहे माझी गोड सासू....!!

विचारपूस अशी करणार, जणू जेम्स बॉण्डची ओलाद
उचापती अशा कि, सारेच पडती नवलात
इतरांपेक्षा तिच असते जास्त जिज्ञासू
अशीच आहे माझी गोड सासू....!!

अशाच प्रलयाची " छाया " पदरी पडली
बघायला गेलो अन बोलतीच बंद पडली
प्रलय काय किंवा तिच सावली काय
आता क्षणभरही देत नाही बसू
अशीच आहे माझी गोड सासू....!!

- सागर लांडगे

## सासू माझी...



भांडलीय सख्ख्या शेजा-यांशी
भांडलीय अख्ख्या चाळीशी
डोळ्यात पाणी येईस्तोवर भांडलीय...
आगडोंब होऊन भांडलीय...

एक कळशी पाण्यासाठी...
रक्ताचं पाणी होईस्तोवर भांडलीय...!!१!!

भांडलीय घर मालकाशी
भांडलीय ही मोलकरणीशी
घश्याला कोरड पडेस्तोवर भांडलीय...
चक्कर येवून पडेस्तोवर भांडलीय....

स्वतःचच खर करण्यासाठी...
मुक्ताफ़ळं उधळीत भांडलीय...!!२!!

भांडलीय आप्त-स्वकीयांशी
भांडलीय येणा-या-जाणा-यांशी
तीचं तिला मिळावं म्हणून भांडलीय...
दुस-यांचही तिलाचं मिळावं म्हणून भांडलीय...

स्वार्थ सिध्दीस नेण्यासाठी...
महामाया बनून भांडलीय....!!३!!

भांडेल तिच्याच सासू-सास-यांशी
भांडेल स्वतःच्या नव-याशी
मुलाला मुठीत ठेवण्यासाठी...
भांडेल कड-कड सुनेशी...

तिसरा कोणी पडता मधे...
खरडमपट्टी काढत भांडेल....!!४!!

मृत्यू उभा ठाकता समोर...त्याच्याशीही भांडेल...
"तू येशील ये....तू नेशीलच मेल्या...ने !!"
पण इतक भांडण नक्कीच करेल...
डोळयात डोळे घालून म्हणेल...


वा.के.खा...वा.के.खा....
(गोठ्यात वासरू केरसुणी खातेय हो !)
जाता जाता यमदूताशीही भांडेल...!!५!!


पण खरं सांगू ???

संसार फ़ुलवा म्हणून भांडलीय
फ़ूलत रहावा म्हणून भांडलीय
कोंड्याचा-मांडा करुन भांडलीय...
शिमग्यलाही दिवाळी गणून भांडलीय....

घरा-दाराच्या सौख्यासाठी ..
काट्यातली फ़ूलं वेचत भांडलीय !!६!!

- सुप्रिया (जोशी) जाधव.





## माझे सासर सासर ...

माझे सासर सासर सासू असे मोक्यावर
किती मारून मनाला रोज बनावे चाकर

जरा कौतुकाचे तिचे कधी नसे गं बोलणे
किती वागावे चांगले तरी मागून टोमणे ....


गोत माहेरचे सारे तिच्या दिमतीला येती
किती करू मागे पुढे शित्या शाप मला देती

लेक गुणाचा सांगते सार्या शेजारा पाजारा
किती सरळ चालावे नसे मला कुठे थारा

केला उभा हा संसार असे हिमतीने बोले
किती केले जरी आंम्ही खालीवर पुंन्हा तोले

नका नका ग सयानो लावू नका जीव कुणी
किती आपले मानले , सून घरची पाहुणी

माझे सासर सासर ऐका सासूचे गाऱ्हाणे
किती सूरात मी गाते का वाटावे रड गाणे



- मनिषा नाईक.

## काय रे देवा ..! (सासु-सुन त्हर्जन )

आता एकदा सुन येणार, मग सासु तिचं कौतुक करणार
मग सासु-सुनेच्या नात्याला नवा अर्थ मिळणार,
मग मधेच काहीतरी बिनसणार,
मग एकमेकींमधे शितयुद्ध सुरु होणार,


काय रे देवा.....!

मग ते शितयुद्ध खुपच पेटणार, मग त्याची धग मुलाला लागणार
पण ती धग मुलाला सहन करावी लागणार,
कुणाला सांगता नाही येणार पण कुणीतरी ते ओळखणार,
मग मित्र असतील तर ते ऐकुन घेणार
नातेवाईक असतील तर उपदेशाचे डोस पाजणार
आणि ह्या सगळ्याशी सुनेला वा सासुला
काहीच घेणं देणं नसणार

काय रे देवा......!

मग एक दिवस स्वयंपाक चालु असणार,
सासु पोळ्या भाजत असणार
एकीकडे भाजी फोडणीस पडणार,
सुन कोशिंबिर करत असणार
मग सुनेच्या टोमॅटो चिरण्यावर सासु कमेंट मारणार
सुन तिथुन रागाने निघुन जाणार
आणि मुलगा उरलेली कोशिंबिर करणार
मग सुनेच्या काळजात आगीचा डोंब उसळणार
आणि परत त्यात मुलगाच होरपळणार

काय रे देवा.....!



मग सुन एक दिवस खुप अपसेट होणार,
तिच्या डोळयात आसवं वाहु लागणार
मग लग्न करुन पश्चाःताप झाल्यासारखं वाटणार,
हातातल्या अंगठीकडे बघुन अजुन रडू येणार
मग छाताडातुन काळीज बाहेर काढावंस वाटणार
मग सारं कसं हरल्या हरल्या सारखं वाटणार,
पण तरीही तिचं मुलावरचं प्रेम कमी नाही होणार


काय रे देवा.....!

एक दिवस सुनेचा ज्वालामुखी फुटणार,
त्यात सासु,सासरे,मुलगा सगळे वितळुन जाणार
मग सासुचं काळिज हादरणार,सासरे मात्र गप्प बसणार
आणि तुम्ही वेगळे रहा असं सांगणार
मग मुलगा आणि सुन वेगळे होणार,
त्यात मुलग्याची फक्त फरफट होणार
मग त्याला हरल्यासारखं वाटणार, मग तो शांत होणार,
दोन्ही आघाड्या त्याच्यापरीने सांभाळुन घेणार
मग सासुच्या घरी सासु असणार, सुनेच्या घरी सुन असणार,
सुनेवरुन झालेलं वादळ मुलाच्या मनात
जाऊन शमलेलं असणार.

काय रे देवा.....!


सुन ह्या घरीही आली,सुन दुसऱ्या घरीही येणार,
आणि हे शितयुद्ध असंच चालु राहणार

काय रे देवा.....!



- आलमगीर

# ई-साहित्य प्रतिष्ठान



मराठी रसिकांना नेहमी उत्तमोत्तम आणि नवनवीन काव्य पुरविण्याचा ई-साहित्य प्रतिष्ठानचा ध्यास ईस्टाप जोमाने पार पाडत आहे. दर आठवड्यात मिळणा-या तुमच्या प्रतिसादांनी आमचा उत्साह उधाण होतोय. आमच्या रसिक वाचकांच्या ह्याच उत्स्फुर्त प्रतिसादामुळे. ईस्टाप अंक सध्या सुमारे ८०००० हून अधिक मराठी रसिङ्क ांना विनामूल्य वितरीत केला जातो. त्या व्यतिरिक्त वेबसाईट्वर व्हिजिट करुन वाचणा-यांची संख्या लक्षणीय आहे. हा अंक आपण आपल्या ईष्टमित्रांना फॉरवर्ड करून त्यांनाही आनंदयात्रेत सहभागी करून घ्यावे ही विनंती. असे करताना आमच्या आयडीचा अंतर्भाव कराल ?....


मग नंतरचे अंक आम्ही त्यांना पाठवत राहू. मराठी कवितेची लोकप्रियता वाढवण्यास आपला हातभार लागावा ही इच्छा. आपल्या सारख्या रसिकांच्या सहाय्याने हा अंक लवकरच एक लक्ष वाचकांपर्यंत नियमित पोहचवण्याचा आमचा संकल्प सिध्दीस जाईल असा आम्हाला विश्वास आहे.

---------------------------------------------

ई-साहित्य प्रतिष्ठान तर्फे रसिकांच्या भेटी खातर येत आहे नविन ई- पुस्तकांची मालिका ...

## " दुर्ग दुर्घट भारी "

या ई-पुस्तकांच्या मालिकेत आम्ही आपल्यासोबत करणार आहोत महाराष्ट्रातल्या परिचित-अपरिचित गडकोटांची ई-यात्रा !..



## ई-साहित्य प्रतिष्ठानची इतर विनामूल्य ई-साप्ताहिके

साप्ताहिक अंक : नेटाक्षरी,
ऑडियो ई नियतकालीक अल्बम: स्वरनेटाक्षरी
मुलांसाठी : बालनेटाक्षरी

## प्रसिद्ध झालेली ई-पुस्तके

टल्लीची शाळा, मकरंदच्या त्रिवेण्या, ग्रेव्हयार्ड लिटरेचर, चार क्षण, तॊ आणि ती, प्रियेचे अभंग, देशी दारुचे दुकान, ई-शाळा, तॊ-मी आणि सिगरेट, मोरया, लोकल गॊष्टी, मीरा(मराठी अनुवाद), ऑथंब, सावळ्या मुलीची गाणी, सईची वही

-----------------------------------------------------------------

वरील ई-बुक्स विनामूल्य मिळण्यासाठी तसेच
सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी संपर्क करा

**esahity@gmail.com**

ईस्टापचा हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी व सूचना, अभिप्राय, प्रतिक्रियांसाठी संपर्क करा

**esahity@gmail.com**

-----------------------------------------------------------------

आता ई-साहित्यची आजवरची सर्व ई-प्रकाशने उपलब्ध आहेत सीडी मध्ये

फक्त ५०/- रुपयांत १११ ई-पुस्तके

संपर्क करा – ९८६९६७४८२०

**www.esahity.com**